ग्रं. सं. ठाणें

०३।०५
४८

REFBK-0019426

REFBK-0019426

REFBK-0019426

श्रीगणेशाय नमः

अथ श्रीमन्मयूरात्मच्छत्रेरिताध्यात्म-
रामायणप्राकृतार्याटीका.

श्रीरामचंद्राय नमः

# अथ सुंदरकांड ५.

---

श्रीमह

शतयोजनायतजल
लिलंघयिषु मारुती अजी डोले ।
हर्षें ध्याउन आत्मा-
राम परम चित्तिं वाक्य हें बोले ॥ १ ॥

सत्वर मातें जात्या
वानर वर तुह्मि सर्व बा पाहा ।
केवळ अमोघ राम-
त्यक्त महाबाणसा च बापा हा ॥ २ ॥

श्रीरामचंद्रपत्नी
आज च मी जनकनंदिनी पाहें ।

लाहें राघवदर्शन
मि कृतार्थ कृतार्थ मी पुन्हा आहें ॥ ३ ॥
प्राणप्रयाणसमयीं
यन्नामस्मरण करुन जन भावें ।
केवळ अपार तरुनी
भवसागर शीघ्र तत्पदा पावे ॥ ४ ॥
मि तदंगांगुलिमुद्रिक
पुनरपि तद्दूत साच बा पाहा ।
त्यातें हृदयीं ध्याउन
अल्पजलधि लंघितों च बापा हा ॥ ५ ॥
आयतवालधि ऐसें
बोलुन हनुमंत बाहुतें पसरी ।
आकुंचितचरणद्वय
आणि ऋजुग्रीव ऊर्ध्वदृष्टि हरी ॥ ६ ॥
तो दक्षिणाभिमुख हो
अनिलपराक्रम कपी उडे तूर्ण ।
अवलोकिती तयातें
आकाशांतून देव संपूर्ण ॥ ७ ॥

पाहुन अनिलसुतातें
विस्मित हो चित्त सर्व देवांचें ।
वदते जाले सत्वर
तत्सत्वपरीक्षणार्थ ते वाचे ॥ ८ ॥

वानर वायुपराक्रम
वीर महासत्व जाय बापा हा ।
लंकाप्रवेश करण्या
शक्त न वा सत्व काय बा पाहा ॥ ९ ॥

इति वदुनी नागांची
माता सुरसाभिधा जि हो सुदती ।
कौतूहलयुत वाचे
तिजला हो सर्व देव ते वदती ॥ १० ॥

जाऊन वानरेंद्रा
त्वां किंचिद्विघ्न त्या करावें गे ।
यावें जाणुन त्याच्या
बुद्धिबलामाजि हो पुन्हा वेगें ॥ ११ ॥

एवं परिसुन जाई
ती हनुमद्विघ्नकारणें डोले ।

मार्गी आडवुनि पुढें
राहुन उभि वानराप्रती बोले ॥ १२ ॥
येईं महामते मम
वदनीं कर तूं प्रवेश लवलाहें ।
हा भक्ष देवकल्पित
आजि क्षुत्पीडितेस मज लाहे ॥ १३ ॥
हनुमंत वदे तीतें
आज्ञा रामाचि घेउनी मातें ।
पाहायातें जानकि
जातों मी सत्य नाडवीं मातें ॥ १४ ॥
रामा तत्कुशल कथुन
पुनरपि आगमन करुन सत्वर तें ।
वदनिं शिरेन नमस्ते
तव मातें देइं वाट सत्वरते ॥ १५ ॥
एवं परिसुन सुरसा
क्षुधितास्म्यहमिति पुन्हा तया बोले ।
जा शिरुन वक्रिं मम तुस
न तरी भक्षिन असें ह्मणुन डोले ॥ १६ ॥

परिसुन हनुमंत वदे
गे शीघ्र विदार आपुलें वदन ।
जातों शिरुन वदनिं तव
हरि आत्माराम हो यशःसदन ॥ १७ ॥

इति वदुन योजनायत
देह पुढें होउनी उभा राहे ।
मुख पंचयोजन करी
ती धरि तो द्विगुणरूप लवलाहें ॥ १८ ॥

तेव्हां विंशतियोजन
सुरसा करि शीघ्र आपुलें वदन ।
त्रिंशद्योजनसंमित
वपु करि कपि जो सुकीर्तिचें सदन ॥ १९ ॥

तेव्हां सुरसा आनन
पंचाशद्योजनायत लवकरी ।
अंगुष्ठसंनिभवपू
वेगें हनुमान् बली यशस्वि करी ॥ २० ॥

वदनिं शिरुन ये पुनरपि
बाहेरी पुरवि शीघ्र हेतूतें ।

बोले तव वदनिं शिरुन
आलों हो देवि नमन हें तूतें ॥ २१ ॥
एवं पाहुन बोले
हनुमंता देवि दे विरे धीर ।
बुद्धिमतांवर साधय
कार्यं रामस्य गच्छ रे वीर ॥ २२ ॥
पाठविती देव अजी
तवबलजिज्ञासु हरिवरा मातें ।
जा गा पाहुन सीते
पुनरपि तूं पाहशील रामातें ॥ २३ ॥
इति वदुन देवलोका
सुरसा जी नागमाय ती जाय ।
वायुसुत वायुमार्गें
पुनरपि जणु गरुड जाय खगराय ॥ २४ ॥
त्या पाहुन मैनाका
मणिकांचनपर्वता समुद्र वदे ।
तो जाय मारुतात्मज
जो देखुन मम मना समुद्भव दे ॥ २५ ॥

श्रीरामकार्यसिद्धी-
साठीं हो तत्सहाय कर वेगा ।
मी पूर्वि सगरवर्धित
सागर हो मज न हाय करवे गा ॥ २६ ॥
त्या सगराच्या वंशीं
जन्मे दाशरथिराम बा पाहा ।
साधायास महाकपि
जाय श्रीरामकार्य बापा हा ॥ २७ ॥
ऊठ जलांतुन वेगें
पळ तो तुजवरति का न सांग रतो ।
वदुनि तथेति निघे वरि
अचल सदानंदकंद सागर तो ॥ २८ ॥
नानामणिमयशृंगीं
अचल महोन्नत वरी नराकृतितें ।
मैनाक मी असें नग
कथि तो त्या वचन वानराकृतितें ॥ २९ ॥
त्वद्विश्रामार्थ मला
आज्ञा करि तो समुद्र घे लक्षीं ।

भक्षि अमृतकल्प फळें
निज आत्माराम मारुते रक्षीं ॥ ३० ॥
पळ विश्रांती येथें
घे मग जा कार्य साधि देवांचें ।
इति परिसुन वायुतनय
शीघ्र हनूमंत जी वदे वाचे ॥ ३१ ॥
मी जाइं रामकार्या-
साठिं कसें मजसि तें सुचे जाणें ।
खाणें अथवा केवीं
विश्रांति त्वरित मज रुचे जाणें ॥ ३२ ॥
इति बोलून कराग्रें
स्पर्शुन त्या पर्वताचिया शिखरा ।
जाय हरीस कळवळे
आत्मारामप्रभू तयाशि खरा ॥ ३३ ॥
किंचिद्दूरगतकपि-
च्छाया छायाग्रह ग्रहण करि ते ।
परि तें हरिमायेचें
कौतुक न दुजें गमे ग्रहण हरितें ॥ ३४ ॥

नित्य जलामध्यें ती
जीचें हो नाम सिंहिका राही ।
जे खगगामिच्छाया
ओढुन आक्रमुन भक्षि घोरा ही ॥ ३९ ॥

तंव तद्गृहीत हनुमान्
थोर महावीर काळजी वाही ।
मम वेगरोधन वदे
कोण करी विघ्न काळ जीवा ही ॥ ३६ ॥

न दिसे कोणिहि येथें
मन्मानस मानि विस्मयाला हें ।
एवं चिन्ता हनुमान्
करुनि अधोदृष्टि सारि लवलाहें ॥ ३७ ॥

तंव तेथ महाकाया
घोरा पाहून सिंहिका हाणी ।
तीस पदीं सलिलिं पडुन
रोषें कपिची विचित्र काहाणी ॥ ३८ ॥

पुनरपि उड्डाण करुन
वातात्मज दक्षिणाभिमुख जाय ।

तंव पाहि जलधिदक्षिण-
कूल विविधविमृगयुक्त कपिराय ॥ ३९ ॥
तेथून मारुतात्मज
पाहे नगर त्रिकूटगिरिशिखरीं ।
परिखांहिं प्राकारीं
युत चिंता प्राप्त हो तयाशि खरी ॥ ४० ॥
केविं शिरूं आंत वदे
हे रावणपालिता असे लंका ।
इति वदुन शिरे रात्रौ
द्वारिं धरुन सूक्ष्मतनु न घे शंका ॥ ४१ ॥
तेथें राक्षसिरूपिणि
साक्षाल्लंकापुरी उभी राही ।
पाही कपिला शिरतां
लंका भे दावि तर्जि धीरा ही ॥ ४२ ॥
वानररूप कवण मज
लंकिनिस अनादरून वद हे तूं ।
इच्छिसि काय कराया
रात्रिं शिरुन चोरसाच वद हेतू ॥ ४३ ॥

इति बोलुन या पादें
ताम्राक्षि चढून हाणि कोपा जी ।
तिस वाममुष्टिनें तो
हाणी रगडून पाणि हो पाजी ॥ ४४ ॥
तंव ती भूमिवर पडे
रक्त वमुन उठुन त्या वदे वाचा ।
हनुमंत महाबल जो
हरि आत्माराम भक्त देवाचा ॥ ४५ ॥
हे हनुमन् भद्रं ते
गच्छ त्वमनघ जिता त्वया लंका ।
ब्रह्मा पूर्वि कथी मज
कथितें मी परिस तूं त्यजीं शंका ॥ ४६ ॥
अष्टाविंशतिपर्ययिं
सीतेसहित हरण्यास भूभार ।
त्रेतायुगिं नारायण
अव्यय दाशरथि धरिल अवतार ॥ ४७ ॥
राघव महावनातें
करिल गमन तो सबांधव सभार्य ।

तेथ महामाया जी
सीता ती हरिल रावण अनार्य ॥ ४८ ॥
पश्चात् सुग्रीवाचें
होइल रामाशिं सख्य तें धन्या ।
सुग्रीव वानरांतें
धाडिल पाहावया जनककन्या ॥ ४९ ॥
तैं एक तवांतिकिं गे
लंके वानर बलाढ्य येईल ।
त्वद्गर्त्सित तोहि तुला
मुष्टीनें वीर मार देईल ॥ ५० ॥
अनघे तूं होशिल
व्यथिता तत्ताडिता यदा लंके ।
निःशंक रावणाचा
अंत च होइल तदैव निःपंके ॥ ५१ ॥
तस्मात् त्वयानघ जितं
सर्वं चापि त्वया जिता लंका ।
शंका सोडीं आत्मा-
रामा गा मीहि आजि निःपंका ॥ ५२ ॥

क्रीडाकानन उत्तम
दशवदनांतःपुरांत रे आहे ।
तेथें अशोकवनिका
दिव्यामितवृक्षसंकुला पाहें ॥ ९३ ॥

तन्मध्यि मध्यग असे
एक महावृक्ष शिंशपानांवें ।
तैं राक्षसीसुरक्षित
जानकि आहे मदुक्त मानावें ॥ ९४ ॥

पाहूनियां च वेगें
जाउनियां राघवा सकळ कळवीं ।
पळवीं चिंता आळविं
आत्मारामप्रभूस कळवळवीं ॥ ९५ ॥

धन्या मी रामस्मृति
भवपाशविमोचनी हि मजला हो ।
राहो दाशरथि मनीं
दुर्लभतद्भक्तसंग मज लाहो ॥ ९६ ॥

जनकात्मजादशानन-
वामाक्षिभुज स्फुरे जलधि जेव्हां ।

मारुति लंघि अतींद्रिय-
राघवदक्षांग तीव्र तें तेव्हां ॥ ९७ ॥

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे सुंदरकांडटी-
कायामात्मकृतायां प्रथमः सर्गः ॥ १ ॥

REFBK-0019426
REFBK-0019426

## श्रीमहादेव उवाच.

तेव्हां तेथुन कपिवर
त्या लंके परमशोभने सटके ।
झटके सूक्ष्मतनु धरुन
रात्रौ पुरिं चहुंकडे न हो अटके ॥ १ ॥

प्रविशे सीतान्वेषण-
कार्यार्थि नृपालयांत लवलाहें ।
पाहे प्रदेशिं सर्वा
कारण हनुमंत मानि नवला हें ॥ २ ॥

देखे न जानकी तंव
लंकावचन स्मरोन कपिराय ।
जाई अशोकवनिके
जीचें सौंदर्य सांगवे काय ॥ ३ ॥

सुरपादपसंबाधा
मणिमयसोपानवापिका शोभे ।
स्वर्णप्रासादयुता
नानामृगपक्षि जें चरति लोभें ॥ ४ ॥

२८७५



बहुफलभारानम्रा
वृक्षांहिं वृता अशोकवनिका ही ।
पाही हरि तच्छोभा
वरि आत्माराम तो कयनिं कांहीं ॥ ५ ॥

प्रतिवृक्ष मरुत्सुत तो
शोधी जनकात्मजेस तंव पाहे ।
चैत्यप्रासाद मणि
स्तंभशतान्वित सुविस्मया लाहे ॥ ६ ॥

किंचित् दूर विलोकी
जाउनियां देउनी पुन्हा लक्ष ।
अत्यंत निबिडपत्रक
देखे हनुमंत शिंशपावृक्ष ॥ ७ ॥

जो होय अदृष्टातप
आकीर्ण स्वर्णवर्णविहगम तो ।
रमतो आत्मारामीं
हरि जो पाहून सन्मना गमतो ॥ ८ ॥

तन्मूलिं जनकनंदिनि
राक्षसिमध्यस्थिता सती लोभे ।